# पूरपरिस्थितीतही मेट्रो-३ धावणार वेगाने : मुख्यमंत्री

## धारावीतील शाप्टमध्ये टीबीएम मशीन लाँच



**मुंबई** : महाकाय अशा टीबीएम मशीनचे लाँचिंग गुरुवारी करण्यात आले असून यामुळे मेट्रो ३ च्या भुयारी कामाला प्रत्यक्ष सुरुवात होत असल्याचे जाहीर करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरपरिस्थितीतही मेट्रो कार्यशील राहणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच मेट्रो ३ च्या कामादरम्यान कुणालाही त्रास होणार नाही, याची ग्वाही या वेळेस मुख्यमंत्र्यांनी दिली. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गातील धारावी येथील नयानगर ते दादर स्थानक दरम्यानच्या भुयारासाठी टीबीएम मशीनचे लाँचिंग मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडले. या वेळेस विनोद तावडे, आशिष शेलार व अन्य भाजपा नेते उपस्थित होते.

टीबीएम मशीनच्या माध्यमातून जमिनीपासून २५ मीटर खाली भुयाराचे खोदकाम करण्यात येणार आहे. १ मशीन दरदिवशी १० मीटरच्या आसपास भुयार खणणार आहे. दक्षिण मुंबईतील जुन्या अडचणीच्या परिसरातही मेट्रो यशस्वीरीत्या कार्यरत राहणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच सध्य उपनगरीय रेल्वेतून ७० लाख प्रवासी प्रवास करतात, तर मेट्रोतून भविष्यात ९० लाख प्रवासी प्रवास करतील आणि रेल्वेवरील भार कमी करण्यास मदत होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. सायंकाळी ६.४० च्या सुमारास धारावी नयानगर येथील शाप्ट अर्थात महाकाय विहिरीमध्ये टीबीएम मशीन स्वयंचलित तंत्रज्ञानाने लाँच करण्यात आले. मेट्रो ३चे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून रस्ते वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत होणार असल्याचे एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी स्पष्ट केले.





### वैशिष्ट्ये

पृथ्वीच्या दाबानुसार नियंत्रण करण्यात आलेली ही टीबीएम मशीन चायना गॉन्झुओ येथे बनवण्यात आली आहे.

---

शाप्टची खोली २५ मीटर असून ६.५ मीटर व्यास आहे. टीबीएम मशीन फ्रंट शिल्ड, मिडल शिल्ड, कटर शिल्ड, हेड, इरेक्टर, स्क्रू कन्वेयर आणि टॉल स्किन शिल्ड असे विविध पार्ट्स आहेत. या टीबीएम मशीनला १२९ कटर्स असून दिवसाला १० मीटर खोदकाम करण्यात येणार आहे. ११० मीटर लांब टीबीएमच्या माध्यमातून २.५ किमीचा दादर मेट्रो स्थानकापर्यंतचे भुयार खोदण्यात येणार आहे.